# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.08.2025** **वारःबुधवार**

---

1. भारत आणि फिलिपीन्स यांच्यातली भागीदारी क्षेत्रिय शांतता, स्थैर्य आणि समृद्धीसाठी लाभदायक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज होणार नवी दिल्लीतल्या कर्तव्य भवनाचं उद्घाटन
3. भारताच्या खनिज तेल आयातीबाबत अमेरिकेनं अलीकडेच केलेली टिप्पणी रशियानं फेटाळली आणि
4. उत्तराखंडमधल्या उत्तरकाशी जिल्ह्यात ढगफुटीमुळे प्रचंड नुकसान, आजही जोरदार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<u>राष्ट्रपती</u>**

भारत आणि फिलिपीन्स यांच्यातली भागीदारी क्षेत्रिय शांतता, स्थैर्य आणि समृद्धीसाठी लाभदायक आहे असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. भारत भेटीवर आलेले फिलिपीन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनान्ड रोमुल्झ मार्कोस ज्युनिअर यांच्या राष्ट्रपती भवनात झालेल्या स्वागत समारंभात त्या काल बोलत होत्या. सांस्कृतिक, ऐतिहासिक बंध आणि समान मूल्यांवर आधारित असलेली भारत आणि फिलिपीन्समधली मैत्री दीर्घकालिन आहे असं राष्ट्रपती म्हणाल्या. या बंधांच्या धोरणात्मक भागीदारीतल्या रुपांतरमुळे दोन्ही देशांमधल्या बहुआयामी सहकार्याला प्रोत्साहन मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<u>पंतप्रधान कर्तव्य भवन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत कर्तव्यपथावर बांधण्यात आलेल्या कर्तव्य भवनाचं उद्घाटन होणार आहे. कर्तव्य भवन 3 हा सेंट्रल व्हिस्टा इमारत संकुलाचा व्यापक विस्तार आहे. प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणि गतीमानता आणण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या केंद्रिय सचिवालयांच्या इमारतींमधली ही पहिली इमारत आहे. या इमारतीत गृह, परराष्ट्र व्यवहार, ग्रामीण विकास, एमएसएमइ, तैल आणि नैसर्गिक वायू यासारख्या काही प्रमुख मंत्रालयांची कार्यालयं असतील. आधुनिक प्रशासकीय कामकाजासाठी आवश्यक पायाभूत सुविधा असलेली ही इमारत शाश्वततेच्या तत्त्वानुसार बांधण्यात आली असून 30 टक्के उर्जा बचतीबरोबरच दरवर्षी पाच लाखांपेक्षा अधिक युनिट वीजनिर्मितीही करेल.

**<u>संसद-मणीपूर मंजुरी</u>**

मणिपूरमधील राष्ट्रपती राजवट आणखी सहा महिन्यांच्या कालावधीसाठी वाढविण्यास काल संसदेत मंजुरी देण्यात आली. येत्या 13 तारखेपासून फेब्रुवारी 2026 पर्यंत राष्ट्रपती राजवटीची मुदत वाढवण्याचा वैधानिक ठराव राज्यसभेत आवाजी मतदानानं संमत करण्यात आला. लोकसभेनं मणीपूरमधील राष्ट्रपती राजवटीचा कालावधी वाढवण्यास गेल्याच आठवड्यात मंजुरी दिली होती. मणिपूरमध्ये 13 फेब्रुवारी 2025 पासून राष्ट्रपती राजवट लागू आहे. राज्यात राष्ट्रपती

राजवट लागू केल्यापासून हिंसाचाराची केवळ एकच घटना घडली असून त्यामध्ये एका व्यक्तीला जीव गमवावा लागला, असं गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी ठरावावरील चर्चेला उत्तर देताना सांगितलं.

**संसद**

संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू होऊन तीन आठवडे झाल्यानंतरही विरोधकांच्या गदारोळामुळे कुठल्याच सभागृहात कामकाज होत नसल्याबद्दल संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी काल नाराजी व्यक्त केली. तीन आठवड्यांत संसदेत एकही विधेयक मंजूर होऊ शकलं नाही असं ते काल माध्यमांशी बोलताना म्हणाले. विरोधकांनी सहकार्य करुन संसदेचं कामकाज सुरळीत चालू द्यावं असं आवाहन रिजिजू यांनी केलं. दरम्यान एनडीएच्या काल सकाळी झालेल्या बैठकीत ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेव यांच्या यशाबाबतचा ठराव संमत झाल्याची माहिती त्यांनी दिली.

**सहकार मंत्रालय**

सहकार क्षेत्राला गतीमान करुन सहकारी संस्थांचं यशस्वी व्यावसायिक संस्थांमध्ये रुपांतर करण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध आहे असं केंद्रिय सहकार मंत्री  अमित शहा यांनी म्हटलं आहे. पाच वर्षांत देशात 2 लाख बहुउद्देशीय सहकारी संस्था उभारण्याचं सरकारचं उद्दीष्ट आहे. यामधल्या 35 लाखांपेक्षा अधिक नवीन सहकारी संस्था स्थापन झाल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. सहकार मंत्रालयाच्या सल्लागार समितीच्या बैठकीत ते काल बोलत होते. सहकार क्षेत्राला चालना देण्यासाठी राज्यांमधल्या दुग्धव्यवसाय संस्थांना बळकटी द्यावी अशी सूचना त्यांनी समितीच्या सदस्यांना केली.

**इनोव्हेशन पार्क-वैष्णव**

सॅप लॅब्स इंडिया इनोव्हेशन पार्क ही भारताच्या विकासाच्या प्रवासात योग्य वेळेत केलेली गुंतवणूक आहे असं मत केंद्रिय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केलं. वैष्णव यांच्या उपस्थितीत कर्नाटकात बेंगळुरू इथं काल या इनोव्हेशन पार्कचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. ही संस्था म्हणजे भारतातली बुद्धीमत्ता आणि नवोन्मेष परिसंस्था यावर जगानं दाखवलेल्या विश्वासाचं प्रतीक आहे. पंतप्रधानांच्या विकसित भारत 2047 या संकल्पनेचा पाया यामुळे भक्कम झाला आहे असं वैष्णव म्हणाले. यावेळी गतीशक्ती विश्व विद्यालय आणि सॅप लॅब्स इंडिया इनोव्हेशन पार्क यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला.

**रशिया-युएस**

भारताच्या खनिज तेल आयातीबाबत अमेरिकेनं अलीकडेच केलेली टिप्पणी रशियानं फेटाळली असून कोणत्याही सार्वभौम देशाला त्याच्या राष्ट्रीय हितासाठी व्यापार भागादीराची स्वतंत्रपणे निवड करण्याचा अधिकार असल्याचंही रशियानं ठामपणे म्हटलं आहे. रशियन प्रशासनाचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी काल मॉस्कोमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत अमेरिका भारतावर दबाव आणत असल्याबद्दल टीका केली.  अशा प्रकाररची कृती अवैध असल्याचं ते म्हणाले. भारत रशियाकडून खनिज तेल विकत घेऊन त्याची पुनर्विक्री करत असल्याबद्दल भारतावर वाढीव आयात शुल्क लादण्याचा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच दिला होता, त्या पार्श्र्वभूमीवर रशियानं ही प्रतिक्रिया दिली आहे.

**भारत-न्यूझीलंड संवाद**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात काल नवी दिल्लीत संरक्षण विषयक धोरणात्मक चर्चा झाली. सुरक्षाविषयक मुद्दे आणि द्विपक्षीय सहकार्याला गती देण्याच्या उद्देशानं ही चर्चा आयोजित करण्यात आली होती. सध्याच्या द्विपक्षीय

संबंधांबाबत समाधान व्यक्त करुन दोन्ही देशांनी प्रशिक्षण, क्षमता उभारणी, संरक्षण उद्योग, सागरी सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य याबाबतीतली भागीदारी आणखी वाढवण्याबाबत चर्चा केली.

**<u>कृषी परिषद</u>**

एम. एस. स्वामीनाथन जन्मशताब्दी आंतरराष्ट्रीय परिषद उद्या नवी दिल्लीत सुरू होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या तीन दिवसांच्या परिषदेचं उद्घाटन होणार आहे. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते स्वामीनाथन यांच्या गौरवार्थ काढलेल्या नाण्याचं आणि टपाल तिकीटाचं प्रकाशन करण्यात येईल अशी माहिती भारतीय कृषी संशोधन परिषदेचे संचालक डॉ. एम. एल. जाट यांनी काल पत्रकारांना दिली. देशातील हरितक्रांतीचे प्रणेते आणि अन्नसुरक्षा संकल्पनेचे जनक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त एम. एस. स्वामीनाथन संशोधन संस्थेनं कृषी मंत्रालय, भारतीय कृषी संशोधन मंडळ आणि राष्ट्रीय कृषी विज्ञान संस्थेच्या सहकार्यानं ही परिषद आयोजित केली आहे. जैवविविधता आणि नैसर्गिक स्त्रोतांचं जतन आणि पर्यावरणपूरक वापर, हवामान बदलास अनुकूल आणि पोषक द्रव्यांना प्राधान्य देणारी शेती, उपजिवीकेचे सर्वसमावेशक आणि तंत्रज्ञान आधारित पर्याय तसंच विकासातला युवा, महिला आणि समाजाचा सहभाग या संकल्पनांवर या परिषदेत विचारमंथन करण्यात येईल.

**<u>बांग्लादेश निवडणूक</u>**

बांग्लादेशात फेब्रुवारी 2026 मध्ये सार्वत्रिक निवडणूक घेतली जाईल असं तिथल्या अंतरिम सरकारचे प्रमुख प्रोफेसर युनूस मुहम्मद यांनी काल जाहीर केलं. आगामी रमजान सणाआधी यासंदर्भातलं पत्र आपण मुख्य निवडणूक आयुक्तांना पाठवणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>पाकिस्तान बॉम्बस्फोट</u>**

पाकिस्तानमध्ये बलुचिस्तान प्रांतातील नुश्की जिल्ह्यात झालेल्या बॉम्बस्फोटात पाकिस्तानच्या लष्कराच्या तीन कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला असून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. बलोच प्रांतात मानवाधिकार संघटनांकडून सुरु असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या स्फोटाची जबाबदारी बलोच लिबरेशन आर्मीनं स्वीकारली आहे.

**<u>उत्तराखंड ढगफुटी</u>**

उत्तराखंडमधल्या खीरगंगा नदीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या ढगफुटीमुळे उत्तरकाशी जिल्ह्यातल्या धराली भागात मालमत्तेचं प्रचंड प्रमाणात नुकसान झालं आहे. ढगफुटीमुळे खीरगंगा नदीला आलेल्या पुरात अनेक घरं वाहून गेली अशी माहिती जिल्हाधिकारी प्रशांत आर्य यांनी दिली. या पुरात चार जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण बेपत्ता झाल्याचं वृत्त आहे. या भागात लष्कर, एनडीआरएफ, एसडीआरएफ, जिल्हा प्रशासन आणि पोलिस युद्धपातळीवर मदत आणि बचावकार्य करत आहेत.

**<u>हवामान</u>**

पुढचे तीन दिवस उत्तराखंडमध्ये जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, हरियाणा आणि उत्तर प्रदेशच्या पश्चिम भागात आज मुसळधार पावसाची शक्यता आहे. केरळमध्ये आज अतीवृष्टीचा लाल इशारा देण्यात आला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**